## *राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक*

*(पिनॅकल मॉल, ४ था मजला, त्र्यंबक नाका सिग्नलजवळ, जुना आग्रा रोड, नाशिक ४२२००२)*

**माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले द्वितीय अपील**

**क्र.रामाआ/नाशिक/द्वितीय अपील क्रमांक २५७५/२०२२/नाशिक**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. शिवाजी फकीरा दांडगे,<br>रा. लक्ष्मी टी. सेंटर, लक्ष्मी टॉकीज शेजारी, मु. पो. ता. श्रीरामपूर,<br>जि. अहिल्यानगर-४१३७०९. | मुख्य लेखापाल,<br>सामाजिक वनीकरण, नाशिक यांचे कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, नाशिक रोड,<br>ता.जि.नाशिक-४२२१०१. | सहायक वनसंरक्षक,<br>विभागीय वन अधिकारी, सामाजिक वनीकरण विभाग नाशिक यांचे कार्यालय, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत, दुसरा मजला, नाशिकरोड,<br>ता. जि. नाशिक-४२२१०१. |

**द्वितीय अपिल सुनावणी दिनांक — ११/०३/२०२५**

| मुळ अर्ज दिनांक | मुळ अर्ज जमाअ यांना प्राप्त दिनांक | जन माहिती अधिकारी यांच्या उत्तराचा दिनांक | प्रथम अपिल अर्ज दिनांक | प्रथम अपिल दाखल केल्याचा दिनांक | प्रथम अपिल आदेश दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| २०/०८/२०२१ | ३१/०८/२०२१ | ०१/१०/२०२१ | २७/०९/२०२१ | ११/१०/२०२१ | ११/०२/२०२२ |

अपिलार्थी यांनी दि. १३/०५/२०२२ रोजीच्या अर्जान्वये "आजरोजी पर्यंत माहिती मिळाली नाही. व अपिल घेतले नाही." असे कारण नमूद करुन कलम १९(३) अन्वये व्दितीय अपिल अर्ज दाखल केला आहे. सदर द्वितीय अपील अर्जाद्वारे कोणतीही विनंती केलेली नाही.

२. सदर द्वितीय अपिलाच्या सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित असून विद्यमान जन माहिती अधिकारी व विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी उपस्थित आहेत.

३. अपिलार्थी यांनी मूळ अर्जान्वये जन माहिती अधिकारी यांचेकडे सन २०१९ ते आजपर्यंत खालीलप्रमाणे माहिती मागितली आहे.

सन २०१९ पासून ते आज पर्यंत या कालावधीतील फॉर्म नं. ३५ रोखलेखाच्या छायांकित प्रती साक्षांकित करुन मिळाव्यात.

४. तद्नंतर अपिलार्थी यांनी जोडपत्र ब मध्ये "कोणत्याही प्रकारे माहिती मिळाली नसुन." असे कारण नमूद करुन प्रथम अपिलीय अधिकारी यांचेकडे कलम १९(१) अन्वये प्रथम अपिल दाखल केले.

५. सुनावणीवेळी उपस्थित विद्यमान जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थी यांचे दि. ३१/०५/२०२२ रोजीचे लेखी निवेदन सादर केले असून त्यामध्ये अपिलार्थीने असे नमुद केले आहे की, मला माहिती अर्जाच्या अनुषंगाने सर्व माहिती प्राप्त झाली असून माझी कोणत्याही प्रकारे तक्रार नाही, माझे समाधान झाले आहे. तरी माझा अर्ज निकाली काढण्यात यावा.

सबब, प्रस्तुत प्रकरणी आयोग खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**आदेश**

प्रस्तुत द्वितीय अपील क्रमांक २५७५/२०२२/नाशिक निकाली काढण्यात येत आहेत.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ नाशिक.

राज्य माहिती आयोग, खंडपीठ नाशिक

जावक क्र. २००६

15 APR